जा.क्रजिपसा/पशुंस/ S.C.P./१६८८/२०१८
पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद,सांगली
दिनांकः- २१/०८/२०१८

**प्रति ,**

**मा. जिल्हा माहिती अधिकारी ,**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत , विजयनगर , सांगली .**

**विषयः- सन २०१८-१९ मध्ये अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत ७५% अनुदानावर शेळी गट (१० शेळी +१ बोकड) वाटप योजनेस व्यापक प्रसिध्दी देणे बाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून पशुसंवर्धन विभाग ,जिल्हा परिषद सांगली या विभागामार्फत सन २०१८-१९ मध्ये वि.घ.योजने अंतर्गत अनुसुचित जाती उपयोजना ७५% अनुदानावर शेळी गट( १० शेळी +१ बोकड वाटप योजना राबविणेत येत आहे. सदर योजनांचे अर्ज तालुक्याच्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांचे कार्यालयामध्येही उपलब्ध असून सदर कार्यालयामध्ये अर्ज पुर्ण भरलेले आवश्यक कागदपत्रासह स्विकारणेची मुदत दिनांकः-२७/०८/२०१८ ते २६/०९/२०१८ पर्यत राहील .

दिनांक :- २६/०९/२०१८ नंतर प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत .सदर योजनांच्या अर्जाचा नमुना जिल्हयाच्या www.sangli.nic.in व www.zpsangli.in या संकेतस्थळावर इच्छुक लाभार्थीना लाभ घेणेसाठी उपलब्ध ठेवण्यात आलेला आहे. तरी सदर योजनेस आपलेमार्फत विविध वर्तमान पत्रामध्ये माहिती देवून व्यापक प्रसिध्दी दयावी ही विनंती.

**तालुकानिहाय लक्ष खालीलप्रमाणे-**

| सन २०१८-१९ अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत ७५% अनुदानावर (१० +१) शेळी गट वाटप उदीष्ट | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | (१० +१) शेळी गटाचे उद्दीष्ट |
| १ | Miraj | ९ |
| २ | K.mahankal | ५ |
| ३ | Jath | ९ |
| ४ | Atpadi | ४ |
| ५ | Khanapur | ४ |
| ६ | Tasgaon | ५ |
| ७ | Islampur | ९ |
| ८ | Shirala | ३ |
| ९ | Palus | ४ |
| १० | Kadegaon | ४ |
| | **Total** | ५६ |

**सोबत :- अर्जाचा नमुना**

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद सांगली

**प्रत- माहीतीसाठी सविनय सादर**

१) मा.अध्यक्ष
२) मा.उपाध्यक्ष
३) मा.सभापती, व सर्व सन्माननीय सदस्य जिल्हा परिषद,सांगली.

**प्रत- माहीतीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

१. मा. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी (nic कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.
२/-कृपया सदरचे पत्र व अर्जाचा नमुना www.sangli.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध ठेवणेत यावा ही विनंती.
२. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी , ( सा.प्र. वि .) जि.प. सांगली.
२/-कृपया सदरचे पत्र व अर्जाचा नमुना www.zpsangli.in या संकेतस्थळावर उपलब्ध ठेवणेत यावा ही विनंती.
३. मा. जिल्हा पशुसंवर्धन उप-आयुक्त ,सांगली. (मु. मिरज )
४. पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ),पंचायत समिती , सर्व
२/-सदरचे अर्जाचा नमुना उच्छुक लाभार्थीना लाभ घेणेसाठी आपले कार्यालया मार्फत उपलब्ध ठेवावा तसेच योजनेस आपण व आपले तालुक्यातील संस्थामार्फत व्यापक प्रसिध्दी देणेत यावी. जेणेकरून जास्तीत जास्त लाभार्थींना या योजनेचा लाभ घेता येईल.

दिनांक - / /२०१८

अर्ज नोंदणी क्रमांक-

| मागील ३ महीन्यातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो |
|---|

## सन २०१८-१९ मध्ये अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत ७५% अनुदानावर शेळी गट ( १० शेळया + १ बोकड )वाटप (लाभार्थीने करावयाचा अर्जाचा नमुना)

प्रति,

मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली.

**विषय- सन २०१८-१९मध्ये अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत ७५% अनुदानावर शेळी गट ( १० शेळी + १ बोकड) मंजूर करणेबाबत.**

**१) अर्जदाराचे नाव- श्री / श्रीमती** ----------------------------------------------------------------

**२) पत्रव्यवहाराचा पत्ता- गावाचे नाव (मु.पो.)** ----------------------------------------------------------
**तालुका ----------------------जिल्हा - सांगली . पिनकोड-------------------------**
**संपर्कासाठी अर्जदाराचा दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्र.**------------------------------------

**३) अर्जदाराचे वय-** (पुर्ण वर्षामध्ये) --------------------

**४) लिंग- स्त्री / पुरुष** (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी )

**५)अर्जदार कोणत्या प्रवर्गाचा आहे.**-अनुसुचित जाती / नवबौध्द--------------जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी.

**६) अर्जदार दारिद्रय रेषेतील आहे का ? होय / नाही** (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी ) **दा.रे.क्र** -

**७) कुटुंब सदस्य संख्या-** पुरुष---------महिला----------एकूण----------

**८) अर्जदाराच्या मालकीची स्वतःची शेतजमीन आहे का? होय /नाही** (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी )
असल्यास तपशील -----------------एकर-----------गुंठे (७/१२ उतारा जोडावा) अर्जदाराची स्वतःची जमीन नसल्यास शेळयांसाठी वाडा बांधावयाच्या जागेचा ७/१२ उतारा व जमीन मालकाचे संमतीपत्र जोडावे.
चारापिके घेणेसाठी सिंचन व्यवस्था उपलब्ध आहे का? **होय/नाही** (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी ).

**९) अर्जदाराकडे सध्या उपलब्ध असलेल्या पशुधनाचा तपशील-**

| अ.क्र. | तपशील | संख्या | अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | गायी- संकरीत /देशी /अवर्णनीय | | ३ | म्हैशी - मु-हा /म्हैसाना / सुरती | |
| २ | मेंढया - डेक्कनी / माडग्याळी | | ४ | शेळया- उस्मानाबादी /संगमनेरी /स्थानिक | |

**१०) अर्जदाराकडे शेळयांसाठी वाडा उपलब्ध आहे का ? होय / नाही** असल्यास किती शेळयांसाठी----------
अस्तीत्वातील वाडा प्रकार- कच्चे बांधकाम / पक्के बांधकाम / गवताचे छपराचे छत
(लागू असेल त्यावर ✓ खूण करावी ) .

**११) अर्जदाराने शेळी पालन विषयक प्रशिक्षण घेतले आहे का ? : होय / नाही** प्रशिक्षण घेतलेले असल्यास प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडावी.

**१२) अर्जदार बचत गटाचा सदस्य आहे का ? - होय / नाही** (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी ) असल्यास बचत गटाचे नाव व पत्ता-------------------- बचतगट ज्या क्षेत्रात काम करीत आहे त्याचा उल्लेख करावा-----------

**१३) अर्जदार सुशिक्षित बेरोजगार आहे का ? होय / नाही** (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी ) **असल्यास** सुशिक्षित बेरोजगार सेवायोजन कार्यालयाचा नोंदणीपत्राची प्रत जोडावी.

**१४)** या योजनेअंतर्गत माझे प्रकरण मंजूर झालेस त्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत संपुर्ण लागणारी रक्कम मी स्वतः उभी करण्याची हमी देत आहे किंवा बँकेकडून कर्ज मंजूर करुन घेणेची जबाबदारी माझेवर राहील. मी संपुर्ण प्रकल्प किंमतीची रक्कम स्वतः उभारून गट खरेदी केल्याशिवाय मला योजनेचा लाभ मिळणार नाही. याची मला जाणीव आहे.

**१५)** अनुदान वर्ग करणेसाठी चालु बँक खात्याचा तपशिल --------------------------------

**प्रमाणीत करतो /करते की, वर नमुद केलेली माहिती पुर्णपणे सत्य आहे. या माहितीमध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी माझ्यावर राहील व त्यामुळे मी उक्त योजनेचा लाभ मिळणेस अपात्र ठरेन अथवा मला योजनेखाली मंजूर करणेत आलेल्या लाभाची वसूली माझेकडून करण्यात येईल याची मला जाणीव आहे व त्यास माझी पुर्ण संमत्ती आहे.**

(पान क्र. २ पहा)

**(१० शेळी + १ बोकड) गटाची किंमत खालीलप्रमाणे :-**

| अ. क्र. | तपशील | प्रकल्पातील दर /किंमती | एकूण किंमत रू. | ७५%अनुदान रक्कम रु. | २५% लाभार्थी हिस्सा रू |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेळी खरेदी | प्रती (उस्मानाबादी/संगमनेरी जातीच्या पैदासक्षम) शेळी ६,०००/- प्रमाणे | ६०,०००/- | ४५,०००/- | १५,०००/- |
| २ | बोकड खरेदी | (उस्मानाबादी/संगमनेरी जातीचा पैदासक्षम नर ) १ बोकड ७,०००/- प्रमाणे | ७,०००/- | ५,२५०/- | १,७५०/- |
| ३ | शेळी व बोकडाच विमा ३ वर्षाचा | किमतीच्या ५.७५% + १०.०३% सेवादर या दराने ३ वर्षाचा विमा | ४,२३९ | ३,१७९/- | १,०६०/- |
| | **एकूण** | | **७१२३९/-** | **५३४२९/-** | **१७८१०/-** |

वरीलप्रमाणे प्रकल्प किंमत ही केवळ अनुदानाची कमाल मर्यादा ठरविणेसाठी असून **जनावरांची बाजार किंमत व विम्याची रक्कम कमी / अधिक होवू शकते याची मला जाणीव आहे.** जादा लागणारी रक्कम मी स्वतः रोखीने अथवा वित्तीय संस्थेमार्फत कर्जरुपाने उपलब्ध करणेस तयार आहे. प्रकल्प किमतीपेक्षा कमी रक्कमेस गट खरेदी केल्यास अनुदानाची रक्कम ७५% प्रमाणे परिगणीत करण्यात येवून त्याप्रमाणेच देय राहील याची मला कल्पना आहे.

**लाभार्थीचे नाव सही -/----------------------------------------**

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे : - (अनु क्र. ०१ ते १० अनिवार्य)**

१. फोटो ओळखपत्राची सत्यप्रत (आधार कार्ड / मतदान कार्ड /पॅन कार्ड) (अनिवार्य ).
२. अनुसुचित जातीचा दाखला (तहसिलदार / प्रांत )सत्यप्रत (अनिवार्य ).
३. रेशनकार्ड सत्यप्रत (अनिवार्य ).
४. अपत्य दाखला - १ मे २००१ नंतर तिसरे अपत्य नसलेबाबतचा( ग्रामसेवकाचा) (अनिवार्य ).
५. ग्रामपंचायतीचे शिफारसपत्र (अनिवार्य ).
६. लाभार्थी किंवा कुटुंबातील सदस्य ग्रा.स./पं.स./जि.प.सदस्य नसलेबाबत ग्रामपंचायतीचा दाखला (अनिवार्य ).
७. लाभार्थी पती /पत्नी पैकी कोणीही शासकिय सेवेत अथवा सेवानिवृत्त नसलेबाबत ग्रामपंचायतीचा दाखला (अनिवार्य ).
८. यापुर्वी पशुसंवर्धन योजनेतून लाभ न घेतलेबाबतचा ग्रामपंचायतीचा दाखला (अनिवार्य ).
९. आधार कार्ड संलग्न असणारे व चालु असणारे बँक खाते पासबुक झेरॉक्स प्रत (अनिवार्य ).
१०. ७/१२ व ८ अ उतारा आणि ग्रामपंचायत नमुना नं. ८. ( दाखले जोडावेत)किंवा जागा उपलब्धतेबाबत संमतीपत्र जोडावे.
११ .प्रशिक्षण घेतलेल्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत (असल्यास प्रमाणपत्र जोडावे).
१२ अपंग असल्यास (अपंगत्व प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत जोडावे).

**लाभार्थी निवडीचा प्राधान्यक्रम - (अनु क्र.०१ ते ०५ मधील कोणताही एक दाखला अनिवार्य)**

१. दारिद्रय रेषेखालील असल्यास दाखला (ग्रामपंचायतीचा) (असल्यास दाखला जोडावा).
२.अत्यल्प भुधारक दाखला (असल्यास दाखला जोडावा).
३.अल्प भुधारक दाखला (असल्यास दाखला जोडावा).
४.रोजगार स्वयंरोजगार कार्यालयाचे नाव नोंदणी कार्डाची सत्यप्रत (असल्यास दाखला जोडावा).
५.बचत गट सदस्य प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत (असल्यास प्रमाणपत्र जोडावे).

---

**प्रमाणपत्र :-**

जा क्र पवैद/ / २०१८पशुवैद्यकीय दवाखाना ---------
ता. ------------- जिल्हा सांगली दिनांक- / / २०१८.

प्रमाणीत करणेत येते की, श्री/सौ/श्रीमती.--------------------------------------------रा.---------------- ता.-------------------जि. सांगली यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या माहिती पैकी प्रत्यक्ष पडताळणी करावयाच्या बाबींची संबधिताचे घरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली आहे. त्या नुसार नमूद तपशील बरोबर आहे.

**संस्थाप्रमुख -**
**(सही व शिक्का) -**

---

**पशुधन विकास अधिकारी (विस्तार)/ गट विकास अधिकारी यांची शिफारस**

जा क्र पसं/ / २०१८, पंचायत समिती-
जिल्हा- सांगली दिनांक- / / २०१८

प्रमाणीत करण्यात येते की, श्री/श्रीमती.------------------------------------------------रा.--------------- ता,-----------------जि. सांगली या लाभार्थीने योजनेच्या नियम व अटीनुसार आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता केली असून त्याची खातरजमा करण्यात आली आहे. सदरचा लाभार्थीस अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत ७५% अनुदानावर शेळी गट (१० शेळी + १ बोकड ) मंजूर करणेस शिफारस आहे.

**पशुधन विकास अधिकारी (विस्तार)**
**पंचायत समिती----------- जिल्हा सांगली**

**गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती ----------जिल्हा सांगली**